राज्यातील आरोग्य संस्थांसाठी औषधे व साहित्य सामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१८/प्र.क्र.२४५/आरोग्य-८

नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: ५ मार्च, २०१९.

संदर्भ-

१) संचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-३/टे-४/वार्षिक मागणीपत्र/अनुदान/१३२४-२५/१८, दिनांक १९.१०.२०१८.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. खरेदी-२०१८/प्र.क्र.२४५/आरोग्य-८, दिनांक ०९/०१/२०१९.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५ जानेवारी, २०१९.
४) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-३/टे-४/प्रशासकीय मान्यता/१८-१९/३३७३-१४/२०१९, दि.२८.०२.२०१९.
५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.

प्रस्तावना –

आरोग्य सेवा संचालनालयाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थांसाठी जिल्हा/स्त्री/सामान्य/ उपजिल्हा/ग्रामीण/ट्रामा व इतर रुग्णालयांसाठी औषधे, कंझ्युमेबल्स, प्रयोगशाळा रसायने व साहित्य, लिनन (कापड चोपड), छोटी हत्यारे आणि सर्जिकल खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत संदर्भाधीन क्र.३ च्या पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय अनुदानाच्या ७० टक्के तरतूदीनुसार विविध औषधे व साहित्य सामुग्री खरेदीसाठी रु.५२,५०,३७,०००/- इतक्या खर्चास संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.२५.१.२०१९ अन्वये उर्वरित अर्थसंकल्पीय अनुदान वितरीत करण्यात आल्यामुळे रु. १५,२०,८२,०९१/- इतक्या खर्चाचे विविध औषधी व साहित्य सामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>-

आरोग्य सेवा संचालनालयाने संदर्भीय दिनांक २८.०२.२०१९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यातील आरोग्य संस्थांसाठी संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आलेली विविध औषधे व साहित्य सामुग्री (एकूण अंदाजित किंमत रु. १५,२०,८२,०९१/-) (रु.पंधरा कोटी वीस लाख ब्याऐंशी हजार एक्याण्णव फक्त) खरेदी करण्यासाठी खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

अ.क्र.	खरेदी करावयाच्या बाबी	एकूण बाबी	अंदाजित रक्कम	लेखाशिर्ष
१	औषधे (विवरणपत्र-अ)	२८	रु. २४,२७,०५,०५०/-	२२१० ०१४६ २२१० ४६२४ २२१० ०४१३ २२१० ०३१५ २२१० ३०४७ २२१० ०२२६ २२१० ई४८२ २२१० G२९८
२	कंझ्युमेबल्स (विवरणपत्र-ब)	५४	रु. २३,४०,६१,२५०/-	
३	प्रयोगशाळा साहित्य व रसायने (विवरणपत्र-क)	२२	रु. ४,५४,५३,३००/-	
४	लिनन (विवरणपत्र-ड)	१५	रु. ९,५४,५२,१२३/-	
५	छोटी हत्यारे (विवरणपत्र-इ)	५६	रु. ३,७७,२५,५००/-	
६	सर्जिकल साहित्य (विवरणपत्र-ई)	१४४	रु. ३,७७,२५,०००/-	
७	छोटी हत्यारे (ऑर्थोपेडीक इंम्प्लांट) (विवरणपत्र-उ)	४३	रु. ३,८२,६८,०९०/-	

१) सदर औषधी व साहित्य सामुग्रींची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी.

२) सदर खरेदीसाठी होणारा खर्च खालील नमूद लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा:-

अ) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- ११०,रुग्णालये व दवाखाने- (०१) मुफसल रुग्णालये व दवाखाने - (०१) (०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये - २१, पुरवठा व सामग्री (२२१० ०१४६) "

आ) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-(०१) (०९) महाराष्ट्र आरोग्य विकास प्रकल्पांतर्गत ग्रामीण / कुटीर रुग्णालयांचे जिल्हा रुग्णालयाइतका दर्जा वाढविणे - २१, पुरवठा व सामग्री (२२१० ४६२४)"

इ) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-(०१) (०८) प्राथमिक आरोग्य केंद्रांचा ग्रामीण रुग्णालयाइतका दर्जा वाढविणे - २१, पुरवठा व सामग्री (२२१० ०४१३)"

ई) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- ११०, रुग्णालये व दवाखाने - (०१) इतर रुग्णालये व दवाखाने - (०१) (०१), कुटीर रुग्णालये - २१, पुरवठा व सामग्री (२२१० ०३१५)"

उ) “२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- राज्य योजनांतर्गत योजना- प्रादेशिक असमतोल दूर करणे-(०६) (०२) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर रुग्णालये व दवाखाने - २१, पुरवठा व सामग्री (२२१० ३०४७) ”

ऊ) “ २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-(०६) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना- (०६) (०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने - २१, पुरवठा व सामग्री (२२१० ०२२६)”

ए) “२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य -(०१) (०२) जिल्हा/उपजिल्हा/ ग्रामीण/महिला रुग्णालयांमध्ये साधनसामग्री व सेवा यांच्या दर्जावाढ करण्यासाठी विशेष कार्यक्रम - २१, पुरवठा व सामग्री (२२१० ई ४८२) ”

ऐ) “२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- (०१)(४५) ट्रामा केअर युनिटची स्थापना - २१, पुरवठा व सामग्री (२२१० जी २९८) ”

३) सदर औषधांचे/उपकरणांचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी यांनी) मान्य केलेल्या विनिर्देशानूसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

४) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

५) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

७) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

८) सदर औषधांच्या/उपकरणांच्या खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपुर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग,क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अटींची पुर्तता करण्यात यावी.

११) दिनांक २६.०७.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुख यांची तसेच आरोग्य सेवा संचालनालयाची राहील.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.४, नियम क्र. ७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१७०१०३१८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.03.06 10:45:57 +05'30'

(ज.स.तडवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

२) व्यवस्थापकिय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. परेल, मुंबई
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
६) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११) निवडनस्ती